**सरकारतर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – विलास नामदेव बिरादार,

वय – ५७ वर्षे, व्यवसाय– शेती,

राहणार – रा. होसुर , ता.निलंगा, जि. लातूर .

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर पाटील. यांचे मार्फत सुरुः–**

१. दिनांक १७.०९.२०२२ रोजी मी घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी होसुर ता. निलंगा येथील कालीदास धोंडीराम बिरादार यांच्या घरासमोर गेलो नव्हतो. पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केला नव्हता. मी दुकानामध्ये असताना पोलिसांनी माझी सही घेतली होती. (आता मला प्रस्तुत कामातील दि.१७.०९.२०२२ रोजीचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला) त्या घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यामध्ये काय लिहिले आहे हे मला माहित नाही. त्यामधील मजकुर आता मला वाचून दाखवण्यात आला. त्याप्रमाणे माझ्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा झालेला नाही.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली. वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०९.२०२२ रोजी पोलिसांनी मला होसुर ता. निलंगा येथील कालीदास धोंडीराम बिरादार यांच्या घरासमोर घटनास्थळ पंचनामा करण्याकरिता बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घटना ठिकाण होसुर ता. निलंगा

येथील कालीदास धोंडीराम बिरादार यांच्या घरासमोर होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, मला वाचून दाखवला आणि त्यानंतर त्याच्यावर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्याकरिता खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एच.व्ही.आलमले यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.05.15 10:37:39 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–१३/०५/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, निलंगा